“महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास- विशेष संदर्भ:नांदेड व निजामाबाद जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,

मानव्य विद्याशाखे अंतर्गत पी.एच.डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केलेला

संशोधन आराखडा

संशोधक

गंगाधर शंकरराव पेन्टे

राजश्री हिल्स्, डिमार्ट समोर, नांदेड

ता.जि.नांदेड

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. एल.बी. डोंगरे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

हु.जयंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

ता.हिमायतनगर जि.नांदेड

जुलै – २०१९

"महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा तुलनात्मक अभ्यास" -विशेष संदर्भ: नांदेड व निजामबाद जिल्हा.

१. प्रस्तावना :-

भारतीय राज्यघटना ही ब्रिटीश राजवट आणि भारतीय समाज यातील आंतर क्रियेचा परिपाक असुन ब्रिटीशांचे आगमन व पुढे १८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश राजवटीच्या भारतावर प्रस्थापित झालेल्या सार्वभौम सत्तेच्या चलनवलनामुळे भारतीयांना व्यक्ती स्वातंत्र्य ,समता, बंधुता,ऐहिकता, कायद्याचे राज्य, जबाबदार शासन इत्यांदीची आधुनिक मुल्यांची व्यक्तीला ओळख झाली. ज्यात व्यक्ती व समाजाला संविधानातील विविध खंड आणि घटनात्मक तरतूदींचा, भारतीय राजकीय व्यवस्थेचा,आकृतीबंध आराखडा व घटनात्मक प्रक्रिया अशा विविध बाबींची माहिती व आकलन भारतीय समाजास झाली आणि म्हणूनच भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही पध्दतीचा स्विकार केला. तर या संसदीय लोकशाही पध्दतीच्या स्विकृतीनंतर भारतात आधुनिक दृष्टीकोनातून लोकशाही विकेंद्रीकरणाची चर्चा राष्ट्रीय चळवळीपासुन सुरू झाली. ब्रिटीशांच्या राजवटीमुळे वसाहतवादी काळात संसदीय शासन पध्दतीचा पाया रोवला गेला. त्यामुळेच संसदीय व्यवस्था ही स्वाभाविकपणेच केंद्रीकरणाकडे झुकलेली आहे. हे स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणींच्या लक्षात आले होते. म्हणूनच "**महात्मा गांधीनी**" विकेंद्रीकरणाचे प्रारूप मांडून स्वावलंबी व स्वायत्त खेडे हाच केंद्रबिंदू मानला तर "**विनोबा भावेंनी**" सर्वोदय चळवळ स्थानिक पातळीवरच उत्पादन आणि वितरणाव्दारे केंद्रीकरण साधण्याचे ध्येय ठेवले. त्याचप्रमाणे "**जय प्रकाश नारायण**" यांनी समाजवादी लोकशाही, स्वयंशाषित

आणि स्वयंनिर्णयी संकल्पना मांडली अशा विविध लोकसमित्यांव्दारे सत्तेचे परिणामकारक विकेंद्रीकरण करण्याची गरज सांगितली.

भारत देशाच्या संदर्भात विचार केल्यास आपणास असे लक्षात येईल की, प्राचीन काळापासून येथे स्थानिक स्वराज्य संस्थांचे आस्तित्व आढळून येते तर स्थानिक स्वराज्य संस्था ही संस्थापुर्वी जात व परंपरागत वारसा या संकुचित आधार स्तंभावर आधारलेली होती. केवळ कर गोळा करणे आणि मालमत्तेचे व जिविताचे संरक्षण करण्यापुरतेच तिचे कार्यक्षेत्रे मर्यादित होते आणि लोकांना जबाबदार असलेल्या निर्वाचित प्रातिनिधीक शासन असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाचा उदय हा सर्वप्रथम **युरोपीय** देशात झाला आहे. आणि ही पध्दती ब्रिटीशांनी भारतात रूजवली, भारतातील आधुनिक काळात सुरू झालेली स्थानिक स्वराज्य संस्थांची पध्दत निर्माण करण्याचे श्रेय **"लार्ड रिपन"** यांच्याकडे जाते. अशा भारतात सुरू झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास पाहता इ.स. १६८७ झाली **मद्रास** या शहरासाठी **पहिली स्थानिक** स्वराज्य संस्था स्थापन करण्यात आली; अशा स्थापन झालेल्या भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास हा ३०० वर्षापुर्वीचा आहे. तर हया ३०० वर्षाच्या कालखंडात देशातील राज्यघटनेत स्थानिक स्वराज्य संस्थांची विविध कार्ये व जबाबदा-या यात वाढ करून नागरी पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व वाढावे. यासाठी विविध प्रकारच्या घटना दुरूस्ती करण्यात आल्या असून,ज्यात विशेषत: ७४ व्या घटना दुरूस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सशक्तीकरणास अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. म्हणनेच स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास हा विविध टप्प्यामंधून करण्यात आला असल्याचेही स्पष्ट होते. तर त्यानुसारच देशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा सध्यकालीन स्थितीचा आढावा घेत असताना "महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलानात्मक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड व निजामाबाद जिल्हा" या प्रस्तूत विषयाव्दारे महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य

संस्थांचा रचनात्मक आढावा, ७४ व्या घटना दुरूस्तीमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यात्मक विकास, कार्ये, जबाबदा-या, स्वरूप आदी घटकांची तुलना ही तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी करून, तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा रचनात्मक आढावा, विकास, कार्ये, जबाबदा-या, स्वरूप यांचा तुलनात्मक अभ्यास करून, या विषयांच्या संशोधनातून स्पष्ट होणा-या समस्या, आढळून येणा-या अडचणी ,कमतरता यावर संशोधनाअंती निष्कर्ष काढुन शिफारशी सुचविणे, या उद्देशाने प्रस्तूत संशोधन विषय निवडला आहे.

२. उद्दिष्टये / संशोधनाची उद्दिष्टये : -

(१) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा अभ्यास करणे / आढावा घेणे.

(२) ७४ व्या घटना दुरूस्तीचा सखोल अभ्यास करणे.

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांचा ऐतिहासिक आढावा घेणे.

(४) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थामधील होणा-या राजकीय हस्तक्षेपाचा हेतू जाणून घेणे.

(६) ७४ व्या घटना दुरूस्तीनंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये झालेला बदल व परिणामांचा अभ्यास करणे.

३. विषय निवडीची आवश्यकता :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सशक्तीकरण्यासाठी ७४ वी घटनादुरूस्ती करून भारतात या स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वरूप समान-सारखे करण्याचा प्रयत्न करण्यात आला व तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा बहाल केलेला आहे. त्यामुळे संपूर्ण भारतात या स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरुप सारखे दिसून येते. पण हा स्थानिक

स्वराज्य संस्थांचा विषय घटनेच्या राज्य सुचित समावेश करण्यात आल्यामुळे प्रत्येक घटक राज्याला यात बदल करण्याचा अधिकार आहे. या अनुशंगाने काही राज्यांना आपल्या विधीमंडळा मार्फत काही कायदे पास करून त्यात काही कार्यकाल, प्रभाग पध्दती, नगराध्यक्षाची निवड, आर्थिक उत्पन्नाची साधने या संदर्भात स्वतंत्र नियम बनविलेले आहेत ते विविध राज्यात कशा स्वरुपाने बदल केलेले आहेत ते जाणून घेण्याच्या उद्देशाने मी हा विषय निवडलेला आहे.

(४) गृहितके / संशोधनाची गृहितके:-

१. स्थानिक स्वराज्य संस्थांचा शहरी भागाच्या विकासात सहभाग आहे.
२. ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थाचे सक्षमीकरण झाले आहे.
३. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रशासकीय कारभारात पारदर्शकता दिसून येते.
४. महाराष्ट्र राज्य व तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेत रचनात्मक फरक आहे.
५. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकिय प्रभाव वाढत आहे.

(५) संशोधन पध्दती:

प्रस्तूत संशोधन विषयाचा अभ्यास हा प्राथमिक व द्वितीयक माहितीच्या आधारे करण्यात येणार असून, भारतीय राज्यघटनेनुसार ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना जरी सक्षमीकरणास मदत मिळाली असली तरी, ७४ व्या घटनादुरुस्तीचा हा विषय राज्य सुचित ठेवण्यात आल्यामुळे यात प्रत्येक घटक राज्यांना आपल्या पध्दतीने बदल करण्याचा अधिकार असल्याने देशातील इतर घटक राज्यात ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेतील बदल, राजकीय प्रभाव, प्रशासकीय कार्यात लोक प्रतिनिधींचा हस्तक्षेप, कार्ये

व जबाबदारी यात वाढ झाली आहे काय? या आदी बाबींचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक स्त्रोतातील **मुलाखत अनुसूची** या तंत्राच्या वापरासह द्वितीय स्त्रोतातील, ग्रंथालय पध्दती, विश्लेषणात्मक पध्दती, ऐतिहासिक पध्दती,अशा आदी संशोधनपध्दतीचा वापर प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

(६) संशोधनाच्या मर्यादाः-

प्रस्तुत संशोधनात केवळ महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास करीत असताना, महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा आणि तेलंगाणा राज्यातील निजामाबाद हया जिल्हयाचा संदर्भ घेवून अभ्यास करण्यात येणार आहे, म्हणून सदर संशोधनाद्वारे काढण्यात आलेले निषकर्ष हे जशास तसे दोन्ही राज्यातील इतर जिल्हयांना लागू पडतीलच असे नाही.

(७) प्रकरणांची मांडणीः-

“महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास” विशेष संदर्भः नांदेड व निजामाबाद जिल्हा हया प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी शोध प्रबंधाची विभागणी ही पुढील प्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिलेः

स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास

प्रकरण दुसरेः

महाराष्ट्र व तेलंगाणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरुप व वाटचाल.

प्रकरण तिसरेः

स्थानिक स्वराज्य संस्थेची घटनात्मक तरतूद

प्रकरण चौथे:

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि तेलंगाणातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा तुलनात्मक अभ्यास.

प्रकरण पाचवे:

निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसुची

१) प्रा.गोविंद यलमवाड “स्थानिक स्वराज्य संस्था” कल्पना प्रकाशन प्रथमावृती-१९९९

२) डॉ.अर्जुनराव दर्शनकार “पंचायतराज आणि नागरी प्रशासन” कैलास पब्लीकेशन्स, गोकुळवाडी, औरंगपुरा, औरंगाबाद- प्रथमावृत्ती-१९९२

३) तुकाराम जाधव, महेश शिरापुरकर- “राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया” द.युनिक ॲकडमी प्रकाशन, आवृती- जानेवारी २०११

४) बंग के आर “ भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ - महाराष्ट्र राज्य” - श्री. मंगेश प्रकाशन , नागपूर सन - २००५

५) फडके य.दी. “ घटना आणि वास्तव” - के सागर प्रकाशन पुणे सन - २००६

६) भोळे भा.ल.-“ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकरण ” - पिंपळापूरे प्रकाशन , नागपूर सन - २००३

७) डॉ. भोगले - “ भारतातील स्थानिक शासन” - सन - २००३

८) ॲड.के.टी.शिरूरकर- “ भारताचे संविधान ” - अशोक ग्रोवर ॲण्ड कंपनी, आवृत्ती - २०११

९) ॲड. अभया शेलकर -“ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी, अधिनियम- १९६५, नाशिक लॉ हाऊस पब्लीकेशन्स, औरंगाबाद सन - २०१६

१०) D.N.Jean Chaudhari – “ Rural Development in India The Maharashtra Zilla Prashad and Panchayat Samiti Act.1961 – Vol I & II ” June -1998

११) Justice A.S. Chandurkar - “ The Maharashtra Municipal Council's nagar panchayats and Industrial Townghips.

१२) डॉ. भुषण जोरगूलवार- " महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण " - चिन्मय प्रकाशन औरंगाबाद - सन २०१३.

१३) क्षिरसागर - " भारतीय संविधान " - के सागर प्रकाशन - पुणे.

१४) डॉ. रावसाहेब कसबे - " डॉ. बाबासाहेब आंबडेकर आणि भारतीय राज्यघटना " - सुगावा प्रकाशन पुणे – सन २००७

१५) डॉ.पुखराज जैन व डॉ.एवं.बी.एल.फडिया -" भारतीय शासन एवं राजनिती (राज्यों की राजनिती सहित) - साहित्य भवन पब्लीकेशन, आग्रा - सन २००८

१६) डॉ. बी.एम.क-हाडे - " शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लीकेशन नागपूर- २००७

१७) The Constitution India, Bare Act, Professional Book Publishers.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एल.बी. डोंगरे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

हु.जयंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

ता.हिमायतनगर जि.नांदेड